(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद. )

१९९६ -१ -एससीआर -४६६

आर.सी. चावला

वि .

हरियाणा राज्य आणि इतर

जानेवारी १२, १९९६

[न्या. के. रामास्वामी आणि न्या. जी. बी. पट्टनायक]

गृहनिर्माण:

हरयाणा नगर विकास प्राधिकरण - निवासी जागेचे वाटप - वाटपाच्या अटींचे उल्लंघन करून वाणिज्यिक प्रयोजनसाठी वापर - अटींचे पालन करण्याचा आदेश - ह. न. वि. प्रा. ला पडताळणी करण्याचे स्वातंत्र्य - वाणिज्यिक प्रयोजन थांबवले आहे असे समाधान झाले असेल तर ते पुन्हा सुरू करण्याचा आदेश मागे घेईल.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक २३४३/१९९६,

पंजाब व हरयाणा उच्च न्यायालयाची १९८८ ची दि. रि. या. क्र. ५५७६ मधील २५.१.९० च्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

एस.के.बग्गा आणि एस. बग्गा अपीलकर्त्यासाठी बाजू मांडली.

आय.एस.गोयल आणि इंदू मल्होत्रा यांनी उतरवादींसाठी बाजू मांडली.

न्यायालयाने पारित केलेला आदेश खालीलप्रमाणे आहे.

अनुमति दिली.

यापूर्वी पारित केलेल्या या न्यायालयाच्या आदेशानुसार, जर अपीलकर्त्याला वाटपाचा लाभ घ्यायचा असेल तर त्याला वाटपाच्या अटींचे पालन करणे आवश्यक आहे. परिणामी, त्यांना वाटपप्राप्त निवासी जागेचा वापर वाणिज्यिक प्रयोजनसाठी करता येऊ शकत नाही. अपीलकर्त्याने ४ जानेवारी १९९६ रोजी सत्यापित केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे, ज्यात इतर गोष्टींसह असे म्हटले आहे :

> "भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मी २.१.९६ पासून माझ्या घराचा वाणिज्यिक वापर बंद केला आहे.
>
> वरील विधान माझ्या माहितीप्रमाणे खरे आहे.

उतरवादींचे विद्वान वकील म्हणतात की त्यांच्याकडे प्राधिकरणाने त्या संदर्भात काय कारवाई केली याची कोणतीही माहिती नाही. विद्वान वकिल श्री. एस. के. बग्गा यांनी उतरवादींच्या विद्वान वकिलांना दाखवून दिले आहे की, हे निवेदन ह. न. वि. प्रा. आणि उतरवादींना देखील कळवण्यात आले होते. अपीलकर्त्याने या जागेचा वाणिज्यिक वापर २ जानेवारी १९९६ पासून

थांबवला होता की नाही, याची पडताळणी करण्याचे स्वातंत्र्य उतरवादींना आहे आणि तसे समाधान झाल्यावर त्यांना पुन्हा सुरू करण्याचा आक्षेपित आदेश मागे घेण्याचे निर्देश दिले जातात.

त्यानुसार अपील निकाली काढण्यात येते. खर्चाबाबत आदेश नाही.

जी.एन. अपील निकाली काढण्यात आले.

**x-x-x-x**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**